**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार, दिनांक १७ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त आज राज्यात सर्वत्र भक्तिपूर्ण वातावरण.**
2. **देशभरात आशुरा-ए-मुहर्रम निमित्त श्रद्धामय कार्यक्रमांचं आयोजन.**
3. **गडचिरोलीत आज १० हजार कोटी रुपयांच्या स्टील प्रकल्पाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न.**
4. **नागपुरात आज पावसाची संततधार, विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात पावसाची हजेरी / गोसेखुर्द धरणाचे पाच दरवाजे अर्ध्या मीटरनं उघडले.**

****

## आषाढी एकादशी

आषाढी एकादशी आज सर्वत्र उत्साहात भक्तिभावान साजरी होत आहे. पंढरपूरसह राज्यभरातल्या विविध विठ्ठल मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आषाढी एकादशीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या उत्सवामुळे आपल्यामध्ये भक्तिभाव, नम्रता आणि करुणा वाढीस लागू दे, तसंच प्रामाणिकपणे सर्वांची सेवा करण्यासाठी प्रेरणा मिळू दे अशी प्रार्थना त्यांनी ट्विट संदेशाच्या माध्यमातून केली आहे. आजच्या देवशयनी आषाढी एकादशीपासून हिंदुधर्मीयांच्या पवित्र चतुर्मासाला सुरुवात होत आहे. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर इथं आज पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापूजा सपत्निक करण्यात आली. मंदिराचं जतन संवर्धन करून मूळ रूपात मंदिर आणण्यासाठी शासनानं ७३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तिरुपतीच्या धर्तीवर पंढरपूरमध्ये विठ्ठल दर्शनाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी १०३ कोटी रुपये निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या महापूजेनंतर बोलताना केली. यंदा शासकीय महापूजेचा मान नाशिक जिल्ह्यतील अंबासन येथील वारकरी बाळू शंकर अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशाबाई अहिरे यांना मिळाला. हे दाम्पत्य सोळा वर्षापासून पांडुरंगाची नित्यनेमाने वारी करत आहे. त्यांचाही मुख्यमंत्र्याच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विदर्भाची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र धापेवाढ्यातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी होत आहे. आज पासून 22 जुलै दरम्यान भरणाऱ्या यात्रेला नागपूर जिल्ह्यासह विदर्भ आणि मध्य प्रदेश तसेच इतर ठिकाणाहून हजारो भक्तगण हजेरी लावत असतात. आषाढी एकादशीचे औचित्य साधून चंद्रपूर इथल्या माता महाकाली मंदिर ते श्री क्षेत्र वढा पर्यंत पायी वारीचे आयोजन आज करण्यात आलं होत. तर आषाढी एकादशी निमित्य आयोजित भव्य पालखी पदयात्रेतील टाळमृदुंगाच्या निनादाने आज गुरुकुंज मोझरी- दुमदुमून गेली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गुरुकुंज आश्रम इथं रामकृष्ण हरी मंदिराची स्थापना केली होती, संतनगरी शेगाव इथं गजानन महाराजांच्या दर्शनासाठी भक्तांची शेगाव मध्ये मोठी गर्दी

पहावयास मिळाली. त्याचबरोबर खामगाव तालुक्यातील १०० वर्षांपेक्षा जुन्या अश्या विठ्ठल रुख्मिणी मंदिरात देखील भक्तांनी गर्दी केली होती.

## मोहरम

आशुरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागांमध्ये मोठ्या श्रद्धेनं आणि भक्तीभावानं पाळला जात आहे. या दिवशी प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हूसेन आणि त्यांच्या साथीदारांनी, सत्य, सत्व आणि न्याय या तत्वांसाठी करबलामध्ये हौतात्म्य पत्करलं होतं. त्या स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो. यानिमित्तानं दिल्लीत जामा मशीद, हजरत निजामुद्दीन, ओखला आणि मेहरौलीसह वेगवेगळ्या ठिकाणी मोहरमच्या मिरवणुका काढल्या जात आहेत. करबला हूतात्म्यांच्या सर्वोच्च बलिदानाला उजाळा देणाऱ्या धार्मिक सभा सुद्धा होत आहेत. वाहतूक पोलिसांनी ताजिया मिरवणुकीबाबत वाहनचालकांसाठी वाहतूक सूचनावली जारी केली आहे. देशात इतरत्रही मोहरमच ताबूत निघत असून, या पार्श्वभूमीवर चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. दरम्यान, अमरावती इथं पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत आज १४ मोर्हरम जुलूस निघणार असल्याने पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी शहरासह विशेषतः नया अकोला, वलगाव बडनेरा शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

## वाघनखं

लंडनच्या व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयातली छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं येत्या एकोणीस तारखेला सातारा इथे पोहचणार आहेत. या ऐतिहासिक घटनेचं स्वागत करण्यासाठी सातारा जिल्हा सज्ज झाला आहे. हा सोहळा अत्यंत दिमाखदार आणि राजेशाही थाटात व्हावा, यासाठी प्रशासनानं संपूर्ण तयारी करावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले आहेत. ही वाघनखं साताऱ्यातल्या छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात ठेवली जाणार असून, ती सकाळी दहा ते पाच या वेळेत नागरिकांना पाहता येतील.

## सुधारित अंदाज

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीन चालू आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी भारताच्या आर्थिक वाढीचा दर वीस शतांशांनी वाढून ७ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यातही नाणेनिधीनं आपल्या वर्ल्ड इकोनॉमिक आऊटलूकमध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा अंदाज ३० शतांशांनी वाढवून ६ पूर्णांक ८ दशांश टक्के केला होता. संस्थेन नुकत्याच प्रकाशित केलेल्या निरीक्षणात, भारताच्या ग्रामीण भागात खासगी खर्चामध्ये वाढ होण्याच्या शक्यतेमुळे हा अंदाज वर्तवला आहे. यामुळे भारत ही जगातली सर्वात वेगवान विकासाभिमुख अर्थव्यवस्था असल्याचं स्पष्ट केलं आहे.

## शिक्षक पुरस्कार २०२४

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ साठी अर्ज करण्याची मुदत वाढवण्यात आली असून, इच्छुक पात्र व्यक्ती येत्या २१ जुलैपर्यंत आपली नामांकनं शिक्षण मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सादर करू शकतात. त्रिस्तरीय निवड प्रक्रियेतून ५० शिक्षकांची निवड होणार असल्याचं शिक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

## स्टील प्रकल्प

सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अहेरी तालुक्यातील वडलापेठ इथं ३५० एकर जागेवर १० हजार कोटी रुपयांचा स्टील प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पाच भूमिपूजन आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते पार पडलं. प्रमुख अतिथी म्हणून उद्योग मंत्री उदय सामंत, अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, पार्थ पवार यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. गडचिरोली जिल्हा हा भविष्यात राज्यातील सर्वात अग्रेसर जिल्हा असेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. भविष्यात लोखंडाचे तीस टक्के उत्पादन एकट्या गडचिरोलीमध्ये होईल, असं फडणवीस म्हणाले. चामोर्शी ते काकीनाडा पर्यंत जलवाहतूक सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचंहि त्यांनी सांगितलं. तर सुरजागड इस्पात कारखान्यामुळे आदिवासी समाजात आर्थिक सुबत्ता येईल. रोजगार उपलब्ध होईल. एक विकसित शहर निर्माण होईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.

## राधाकृष्ण विखे पाटील

राज्यातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी अमुल उद्योग समुहासह इतरही प्रक्रीया केंद्रानी अतिरिक्त २० लाख लिटर दूधाचे संकलन करावं असं आवाहन दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे. या प्रक्रीया केंद्रानी सहकार्य केल्यास राज्यातील दूध उत्पादकांना ३५ रुपये भाव देण शक्य होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## नाना पटोले

विधान परिषद निवडणुकीत पक्षादेश झुगारून विरोधी उमेदवारांना मतदान करणाऱ्यां विरोधात कारवाईचा प्रस्ताव काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पक्ष श्रेठींकडे पाठवला आहे. याबाबतचा निर्णय, परवा १९ तारखेला मुंबईत होणाऱ्या बैठकीत घेतला जाणार आहे. विधान सभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज चंद्रपूर इथं ही माहिती दिली.

## चंद्रपूर कुष्ठरोगाचे निर्मूलन

कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्याकरीता भारत सरकारन सर्व राज्यांना प्रत्येक जिल्हयाकरीता 'जिल्हा धोरणात्मक कृती आराखडा' तयार करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. चंद्रपूर जिल्हयातील कुष्ठरुग्णांचे प्रमाण लक्षात घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात चंद्रपूर जिल्हा धोरणात्मक कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार दर तीन महिन्याने विशेष कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार असून यातील दुसरी फेरी 15 ते 31 जुलै या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील एकूण 5 लक्ष 55 हजार 806 नागरिकांची तपासणी करण्यात येईल.

## हवामान

नागपुरात आज अनेक दिवसांनी बहुप्रतिक्षित अश्या पावसाची संततधार बघायला मिळाली. सकाळी काही अंतराने बरसणारा पाऊस दुपारनंतर मात्र सातत्यपूर्ण वर्षाव करत आहे. दरम्यान, विदर्भाच्या अन्य जिल्ह्यांमध्ये देखील आज पावसानं हजेरी लावली आहे. आज अकोल्यामध्ये पाऊस झाल्याचं तसेच गडचिरोलीमध्ये ढगाळ वातावरणासह हलका पाऊस झाल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे. दरम्यान गोंदिया जिल्ह्यामध्ये आज दमदार पावसाची हजेरी झाल्यान भात पिकाला याचा मोठा फायदा झाला आहे. येत्या काही तासात नागपूर, भंडारा, गोंदिया, तसच चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे. आगामी 21 जुलै पर्यंत विदर्भात सर्वत्रच पावसाची हजेरी राहू शकते. उद्या 18 जुलै रोजी चंद्रपूर आणि गडचिरोली मध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय हवामान विभागानं कोकण आणि मध्य महाराष्ट्रात येत्या पाच दिवसांसाठी पावसाचा ऑरेंज अॅलर्ट जारी केला आहे. या भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## गोसेखुर्द

गोसेखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सतत पाऊस होत असल्यामुळे गोसेखुर्द धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्याकरिता गोसेखुर्द धरणाचे पाच दरवाजे अर्ध्या मीटर पर्यंत उघडण्यात आले असून, 25 हजार 374 क्यूसेकन पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.त्यामुळे नदी पात्राजवळील गावांना तसंच नदी पात्रातून आवागमन करणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याच आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

******